This question paper consists of 37 questions and 12 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 12 छापील पाने आहेत.

Roll No. / अनुक्रमांक

Code No. 68/S/O/M
कोड नं.

Set / सेट - A

# MARATHI
## (मराठी)
## (204)

Day and Date of Examination
(परीक्षेचा दिवस आणि तारीख) ____________________

Signature of Invigilators 1. ____________________
(निरीक्षकाची सही) 2. ____________________

**सामान्य अनुदेश :**

1. सर्व प्रश्नांचे उत्तर तुम्हाला दिलेल्या उत्तर–पुस्तिकेतच लिहायची आहेत.
2. या प्रश्न–पत्रिकेला वाचण्यासाठी 15 मिनिटाचा वेळ दिला गेला आहे. प्रश्न–पत्रिकेचे वितरण दुपारी 02.15 वाजता करण्यात येईल. 02.15 ते 02.30 पर्यंत विद्यार्थी केवळ प्रश्न–पत्रिका वाचतील आणि या वेळेत उत्तर–पुस्तिकेत कोणतेही उत्तर लिहणार नाहीत.
3. परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.
4. कृपाकरून प्रश्न–पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रूपात असावी.
5. बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर–पुस्तिकांमध्ये योग्य उत्तर लिहायचे आहे.
6. बहुपर्यायी प्रश्नांच्या सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.
7. उत्तर–पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.
8. आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेची कोड संख्या 68/S/O/M, सेट - A लिहावेत.



Unnati Educations
For Solutions, Contact Us
9899436384,9654279279

**MARATHI**

**(मराठी)**

**(204)**

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 100

**निर्देश :**

(i) या प्रश्नपत्रिकेत एकूण **37** प्रश्न आहेत आणि सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(ii) प्रश्नपत्रिकेत दोन विभाग आहेत. विभाग–**अ** आणि विभाग–**ब**

(iii) विभाग 'अ' मध्ये वस्तुनिष्ठ/बहुपर्यायी प्रश्न आहेत तर विभाग 'ब' मध्ये विषयनिष्ठ/वर्णनात्मक प्रश्न आहेत. विभाग **अ – 50** गुण व विभाग **ब – 50** गुण आहेत = **100** गुण

(iv) विभाग 'अ' मध्ये एकूण **27** प्रश्न आहेत.

- प्रश्न क्र. **1** ते **12** गद्य
- प्रश्न क्र. **13** ते **20** पद्य
- प्रश्न क्र. **21** ते **27** व्याकरण

(v) विभाग 'ब' मध्ये एकूण **28** ते **37** प्रश्न आहेत.

- प्रश्न क्र. **28** ते **30** गद्य–पद्य
- प्रश्न क्र. **31** ते **32** व्याकरण
- प्रश्न क्र. **33** ते **34** उताऱ्यावरील प्रश्न
- प्रश्न क्र. **35** ते **37** लेखन कौशल्यावर आधारित उदा. निबंधलेखन, पत्रलेखन व सारांशलेखन इ.



Unnati Educations
For Solutions, Contact Us
9899436384,9654279279

## विभाग–अ (वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न)

दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1 भूदान व सर्वोदय चळवळीचे प्रवर्तक कोण होते? 1

(अ) आचार्य विनोबा भावे (ब) महात्मा गांधी

(क) जोतीराव फुले (ड) लोकमान्य टिळक

2 लक्ष्मीबाई टिळक व रेव्हरंड टिळक यांनी एक मुलगी सांभाळावयास घेतली होती तिचे नाव काय ठेवले? 1

(अ) तारा (ब) कावेरी

(क) जान्हवी (ड) गंगा

3 शेतकऱ्यांची स्थिती हा उतारा कोणत्या ग्रंथातील आहे? 1

(अ) शेतकऱ्यांचा आसूड (ब) गुलामगिरी

(क) तृतीय रत्न (ड) शेतकरी आजचा

4 चूक की बरोबर सांगा. 3

(1) इंग्रजांच्या विरोधात 'वंदेमातरम्'चा उद्घोष करीत लहान मुलांच्याही फेऱ्या निघत होत्या.

(2) रेव्हरंड ना.वा. टिळक यांनी अनेक अनाथ मुलांचे त्यांच्या घरी पालनपोषण केले नाही.

(3) महर्षी कर्वे आणि त्यांच्या पत्नी बाया यांना समाजाने खूप त्रास दिला.

5 रिकाम्या जागा भरा. 3

(1) ______ ने आरंभ होणारे हे पत्र मी जपून ठेवले आहे.

(2) भारतीयांनी टिळकांना ______ ही पदवी उत्स्फूर्तपणे बहाल केली आहे.

(3) ______ हा नागू गवळ्याचा हातखंडा विषय होता.

6 जोड्या लावा – पाठ आणि पाठाचे लेखक यांच्या जोड्या लावा. 4

| | (पाठ) 'अ'गट | (लेखक) 'ब'गट |
|---|---|---|
| (1) | शेतकऱ्यांची स्थिती | वि.स. खांडेकर |
| (2) | श्री | लक्ष्मीबाई नारायण टिळक |
| (3) | तू तर माझ्याही | प्र.के. अत्रे |
| (4) | महर्षीचे स्वर्गारोहण | महात्मा फुले |



Unnati Educations
For Solutions, Contact Us
9899436384,9654279279

दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

7 पारतंत्र्याच्या काळात आपल्या देशात ______ भाषेचे वर्चस्व वाढले होते. 2

(अ) इंग्रजी (ब) हिंदी

(क) मराठी (ड) गुजराथी

8 आईच्या मनातील मुलांसाठी असलेला अहंकाररहित भाव म्हणजे ______ 1

(अ) कर्मणि प्रयोग (ब) भावे प्रयोग

(क) कर्तरी प्रयोग (ड) यापैकी नाही

9 आधुनिक भारतमधला अण्णा हे एक अद्भुत चमत्कार होते, म्हणजे 1

(अ) अण्णांनी आयुष्यात खूप चमत्कार केले.

(ब) अण्णा एकशेपाच वर्षे जगले.

(क) ते इतिहासातील क्रांतिकारक होते.

(ड) जे जे मनोरथ त्यांनी रचले ते पूर्ण झालेली पाहण्यासाठी त्यांना निरामय दीर्घायुष्य लाभले.

10 सावकारही शेतकऱ्याला जवळ उभा करत नाही, कारण ______ 1

(अ) शेतकऱ्यावर कर्जाचा डोंगर झालेला आहे.

(ब) शेतकरी सावकराकडे जात नाही.

(क) शेतकरी व सावकार यांचे पटत नाही

(ड) शेतकरी शेती सोडून दुसरा धंदा करतात.

11 इंग्रजांनी हेगडेवार यांच्यावर खटला भरला कारण ______ 1

(अ) डॉ. स्वयंसेवक दलाचे प्रमुख होते.

(ब) हिंदू महासभेचे काम केले होते.

(क) डॉक्टरांनी अतिशय जहाल भाषणे केली होती.

(ड) डॉक्टरांनी मजबूत संघटन केले होते.

12 लग्नपत्रिकेला ______ लावलाच पाहिजे, हा लेखकाचा आग्रह आहे. 1

(अ) तांदूळ (ब) कुंकुमतिलक

(क) डिंक (ड) केशर



Unnati Educations
For Solutions, Contact Us
9899436384,9654279279

दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

13 दलित समाजाला कोणाच्या रुपात महामानव लाभला? 1

(अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (ब) महात्मा फुले

(क) महर्षी कर्वे (ड) लक्ष्मीबाई टिळक

14 पसायदान म्हणजे काय? 1

(अ) गीतेचा अर्थ (ब) अभंग रचना

(क) प्रसादाचे दान (ड) परमभक्ती

15 चूक की बरोबर सांगा. 3

(1) कवी कुसुमाग्रज यांनी नक्षत्रांना प्रश्न विचारला.

(2) वीरपत्नी आपल्या पतीच्या भाली विजयतिलक लावणार आहे.

(3) भारतदेश बलसंपन्न व वैभवसंपन्न व्हावा अशी कवीची आकांक्षा नाही.

16 रिकाम्या जागा भरा. 3

(1) आता _______ घेणाऱ्या हवेल्यांना सुरुंग लावलाच पाहिजे.

(2) इथल्या _______ अवधे विश्व तरावे

(3) इथे _______ जन्मा येती

17 कविता आणि कवी यांच्या जोड्या लावा. 4

| **(कविता) 'अ' गट** | **(कवी) 'ब'गट** |
|---|---|
| पहा टाकले पुसुनी डोळे | ज्ञानेश्वर |
| पाऊलचिन्हे | मंगेश पाडगांवकर |
| पसायदान | कुसुमाग्रज |
| या जगण्यावर | शांता शेळके |



Unnati Educations
For Solutions, Contact Us
9899436384,9654279279

18 दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. 1

हे कंकण करी बांधियले
जनसेवे जीवन दिधले
देशार्थ प्राण हे उरले,

या कवितेच्या ओळींत कोणता अलंकार आला आहे?

(अ) अनन्वय (ब) अनुप्रास

(क) यमक (ड) रूपक

19 'पहा टाकले पुसुनी डोळे' ही कविता कवयित्री शांता शेळके यांच्या कोणत्या कवितासंग्रहातून घेतली आहे? 1

(अ) गोलपिठा (ब) तोच चंद्रमा नभात

(क) पत्री (ड) विशाखा

20 प्रत्येकजण पिल्लाशी कसा बोलत असे? 1

(अ) टोचून (ब) धिक्कारून

(क) आनंदाने (ड) दु:खाने

दिलेल्या पर्यायांमधून अधोरेखित शब्दाचा अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

21 आकाशात काळे ढग <u>आहेत</u>. या वाक्यातील काळ ओळखा. 1

(अ) भविष्यकाळ (ब) भूतकाळ

(क) वर्तमानकाळ (ड) रीती भूतकाळ

22 खस्ता खाणे या वाक्प्रचाराचा अर्थ – 1

(अ) वाईट वाटणे (ब) काम करणे

(क) आनंदाने हसणे (ड) कष्ट करणे



Unnati Educations
For Solutions, Contact Us
9899436384,9654279279

**23** चूक की बरोबर लिहा. **3**

(अ) जे अव्यय सर्वसाधारणपणे सर्व शब्दप्रकारांना जोडून घेते व वाक्यातील शब्दांशी असलेला संबंध दाखविते त्याला शब्दयोगी अव्यय म्हणतात.

(ब) दोन व्यक्ती किंवा संस्था यांच्यात दळणवळण आणि संवाद निर्माण करणारे पत्र हे प्रभावी माध्यम आहे.

(क) दोन शब्द किंवा दोन वाक्ये जोडणाऱ्या अविकारी शब्दांना क्रियापद म्हणतात.

**24** दिलेल्या पर्यायांतून अचूक शुद्ध शब्द ओळखा. **3**

(1) (अ) निर्माल्य (ब) नीरमाल्य (क) नीर्माल्य (ड) निःमाल्य

(2) (अ) उदघोष (ब) उददघोष (क) उद्घोष (ड) यांपैकी नाही

(3) (अ) क्षितीज (ब) क्षीतीज (क) क्षितिज (ड) क्षीतिज

**25** दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. **3**

(1) शेतकऱ्याला <u>वारंवार</u> कोर्टात जावे लागते. या वाक्यातील अधोरेखित शब्दास काय म्हणतात ?

(अ) क्रियापद (ब) क्रियाविशेषण अव्यय

(क) केवलप्रयोगी अव्यय (ड) विशेषण

(2) वाक्यात एकाच प्रकारचे दोन, तीन शब्द लागोपाठ आल्यास त्यातील प्रत्येक शब्दानंतर ________ देतात.

(अ) पूर्णविराम (ब) स्वल्पविराम

(क) प्रश्नचिन्ह (ड) सर्वनाम

(3) खरेखोटे, हे या द्वंद्व समासाचे उदाहरण आहे.

(अ) इतरेतर (ब) समाहार

(क) वैकल्पिक (ड) द्विगू



Unnati Educations
For Solutions, Contact Us
9899436384,9654279279

**26** सूचनेप्रमाणे लिहा. **2**

पुढे दिलेल्या शब्दसमूहाला एक शब्द सुचवा.

(अ) आपल्या देशात तयार झालेली

(ब) गुरे बांधण्याची जागा

**27** खालील शब्दांच्या समानार्थी शब्दांत जोड्या जुळवा. **2**

| | |
|---|---|
| (अ) भोजन | (अ) इसम |
| (ब) असामी | (ब) आहार |
| (क) भाऊ | (क) कहाणी |
| (ड) कथा | (ड) भ्राता |

**28** खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे **20** ते **30** शब्दांत लिहा. **6**

(अ) भाषेच्या विकासासाठी सुशिक्षितांनी कोणती कामे केली पाहिजेत, असे लोकमान्य टिळकांना वाटते ?

(ब) आचार्य विनोबाजींच्या मते देशाला चांगले नागरिक केव्हा मिळतील ?

(क) लग्नापूर्वी नागूचा रोजचा कार्यक्रम काय असे ?

(ड) महर्षी कर्वे यांच्या कोणत्या कार्याला लेखक चमत्कार म्हणतो ?

**29** खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे **20** ते **30** शब्दांत लिहा. **6**

(अ) 'हे कंकण करी बांधियले' असे कवीने का म्हटले आहे ?

(ब) ज्ञानेस्वरानी दुष्ट लोकांसाठी कोणती इच्छा प्रकट केली आहे ?

(क) सूर्याकडे पाठ फिरवून शतकांचा प्रवास कुणी व कसा केला ?

(ड) वीरपत्नी आपल्या पतीला रणांगणावर कसे जाण्यास सांगत आहे ?



Unnati Educations
For Solutions, Contact Us
9899436384,9654279279

30 खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे **30** ते **50** शब्दांत लिहा. **6**

(अ) 'श्री'च्या बाबतीत लेखकाने कोणता पोक्त विचार केला?

(ब) घरी आलेली बाई हिंदू किंवा खिस्ती आहे याचा अंदाज लक्ष्मीबाईना का आला नाही?

(क) कवीने पिल्लाच्या दुःखाचे वर्णन कसे केले आहे?

(ड) तिन्ही लोकांसाठी ज्ञानेश्वरांनी कोणती प्रार्थना केली आहे?

31 (अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. **2**

(अ) जनावरांचा ______

(ब) फुलांचा ______

**किंवा**

'नामानिराळे असणे'या वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

(ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. **2**

(अ) अनुकूल ______

(ब) आरंभ ______

(क) उष्ण ______

(ड) स्तुती ______

32 कंसातील सूचनेनुसार प्रश्न सोडवा. **4**

(अ) मी पुस्तक वाचले **2**

(या वाक्यातील सर्वनाम शोधून लिहा.)

(ब) कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठराविक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे वेगळ्या अर्थाने आल्यास ______ अलंकार होतो.

(रिकामी जागा भरा.)

**किंवा**



Unnati Educations
For Solutions, Contact Us
9899436384,9654279279

'कसे वाटते तुम्हाला?'

(या वाक्यात वापरलेली विरामचिन्हे लिहा.)

(ब) खालील वाक्यातील काळ ओळखा. 2

(अ) माझ्या भ्रमाचा भोपळा फुटला.

(ब) श्री या अक्षरावर लहानपणापासूनच माझे मोठे प्रेम आहे.

33 खालील उतारा वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

चार माणसे कुठेही थोडा वेळ जरी एकत्र जमली की, दुसऱ्याचे दोष आणि इतरांची टवाळी हा त्यांच्या बोलण्याचा मुख्य विषय असतो. म्हणजे ही एक प्रकारची परनिंदाच चाललेली असते. मद्याची नशा चढावी त्याप्रमाणे परनिंदेची धुंदी माणसाला चढत असते. स्वतःच्या अंतःकरणातील आणि भोवतालच्या वातावरणातील प्रसन्नता नाहीशी करून सर्वत्र दुःखाचे, द्वेषाचे आणि औदासीन्याचे वातावरण निर्माण करण्यास हातभार लावीत असतो. धूर ओकणाऱ्या ज्योतीमुळे दिव्याची काच धुरकटून जाते. दिव्याचा प्रकाश हरपून जातो. मात्र ज्योतीची काजळी झटकली, ती मर्यादित ठेवली व दिव्यावरील काच रोज स्वच्छ पुसली की, प्रकाश अवतीभवती लख्ख पसरतो. तसेच आपण पहाटे उठण्यापूर्वी किंवा रात्री झोपण्यापूर्वी

मनाच्या काचेवर इतरांच्या अवगुणांच्या विचाराने जमलेली काजळी अंतःकरणातील क्षमेच्या राखेने पुसली की, आपले मन दिवसभर टवटवीत राहते.

(1) चार माणसे एकत्र जमली की त्यांच्या बोलण्याचा विषय काय असतो?

**किंवा**

परनिंदेची धुंदी माणसाला कशी चढते?

(2) प्रकाश अवतीभवती लख्ख केव्हा पसरतो?

**किंवा**

आपले मन दिवसभर टवटवीत केव्हा राहते?

(3) परनिंदेचा विषय कशास हातभार लावतो?



Unnati Educations
For Solutions, Contact Us
9899436384,9654279279

34 खालील पद्यांश वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा. 3

पोटाच्या खळगीसाठी
बांधुन बिऱ्हाड पाठी
तांडा चालला, तांडा चालला...
ह्या दुष्काळी लोकांची पोथीच कुणीना वाची
एक दिसाची भाकर भाजी मुळीच नाही गाठी
तांडा चालला, तांडा चालला...
धान्याच्या शोधासाठी पाण्याच्या शोधासाठी
केवळ आपल्या पोटासाठी मुकादमाच्या पाठी
तांडा चालला, तांडा चालला...
ही गाडी ढळली आता ही मूठ आवळली आता
या गाडीचा गाडीवान हा लढेल क्रांतीसाठी
तांडा चालला, तांडा चालला...
समतेचा वाही वारा ना पिळवणुकीला थारा
त्या नगरीच्या शोधासाठी नव्या माणसासाठी
तांडा चालला...

(1) कोणाची पोथी वाचली जात नाही ?

**किंवा**

कशाच्या शोधासाठी तांडा चालला आहे ?

(2) तांडा मुकादमाच्या पाठी का जात आहे ?

**किंवा**

या गाडीचा गाडीवान कशासाठी लढेल ?

(3) समता व पिळवणूक याबाबत कवी काय सांगतात ?



Unnati Educations
For Solutions, Contact Us
9899436384,9654279279

**35** पुढील उताऱ्याचा सारांश एक तृतीयांश शब्दांत तुमच्या भाषेत लिहा व उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. **4**

अहिंसा हे एक फार मोठे मूल्य आहे. नाइलाज झाल्याशिवाय हिंसा करूच नये, अशी भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. पण हिंसा म्हणजे तरी काय? प्राण घेणे, जिवानिशी मारणे किंवा दुसऱ्याला शारीरिक इजा करणे एवढीच हिंसेची व्याप्ती आहे? नाही दुसऱ्याचे मन दुखावणे, टोचून बोलणे, अपमान करणे, हिणवणे, आनंद हिरावून घेणे ही सारी हिंसेचीच रूपे आहेत. भरतात महात्मा गांधींनी अहिंसेचा मोठा प्रयोग केला. बलाढ्य ब्रिटिश सत्तेला अहिंसेने जेरीस आणले. इतकी वर्षे तुरुंगात डांबून ठेवलेले नेल्सन मंडेला विजयी झाले. दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांना आता न्याय मिळू लागला आहे. ब्रिटिश माणसाबद्दल द्वेष किंवा तिरस्कार न वाटता, त्यांच्या राजवटी विरुद्ध लढा द्यायला गांधीजींनी शिकवले.

**36** शाळेच्या ग्रंथालयासाठी 'खरेखुरे आयडॉल' आणि 'अग्निपंख' ही दोन पुस्तके प्रकाशक, पॉप्युलर प्रकाशन, 35 सी.पं. मालवीय मार्ग, ताडदेव मुंबई 400034 यांच्याकडून मागविण्यासाठी त्यांना पत्र लिहा. **4**

**किंवा**

तुमच्या परिसरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे, त्याच्या बंदोबस्तासाठी आयुक्त, महानगरपालिका, आरोग्य विभाग यांच्याकडे तक्रार अर्ज लिहा.

**37** खालीलपैकी एका विषयावर 150 ते 200 शब्दांत निबंध लिहा. **6**

(1) माझे आवडते शिक्षक

(2) तानाजी मालुसरे पुन्हा अवतरले तर...

(3) प्रदूषणाच्या विळख्यात

(4) दूरचित्रवाणीचे मनोगत

---



Unnati Educations
For Solutions, Contact Us
9899436384,9654279279